International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 5.136
Vol.5 No.1 Sept– Oct 2017

# मोबाईल बँकिंग: बँकिंग विकासातील महत्त्वाचे साधन

**डॉ. धनाजी आप्पासो चौगले**
*अर्थशास्त्र विभाग प्रमुख*
*भोगावती महाविद्यालय, कुरुकली*

**गोषवारा :**

बँकिंग क्षेत्रात एकविसाव्या शतकात माहिती व तंत्रज्ञानामुळे अमुलाग्र बदल झाला आहे. क्रेडिट कार्ड व डेबिट कार्ड चा मोठ्या प्रमाणात वापर अनेक अनेक ठिकाणी केला जात आहे. मोबाईल बँकिंग भविष्यातील बँकिंग क्षेत्र विकासाचे एक साधन आहे. मोबाईल बँकिंग मुळे जग जवळ आलेले आहे ग्राहकाजवळ जर अँड्रॉइड मोबाइल असेल व इंटरनेटची उपलब्धता असेल तर तो बँकेचे मोबाईल ॲप आपल्या मोबाईल मध्ये डाऊनलोड करून त्याचा वापर बँकिंग व्यवहारासाठी तू करू शकतो. हे एक सुरक्षित ॲप आहे कारण या ॲप सी आपला मोबाईल क्रमांक कनेक्ट असल्यामुळे ज्या ज्या वेळेला आपण हे ॲप ओपन करतो किंवा उघडतो त्यावेळा आपल्या मोबाईल क्रमांकावर एसएमएस येतो त्याच बरोबर कोणताही व्यवहार करीत असताना आपल्याला एक ओटीपी येतो या ओटीपी चा वापर करूनच आपण व्यवहार पूर्ण करू शकतो म्हणून मोबाईल बँकिंग कडे सुरक्षित साधन म्हणून पाहिले जात आहे मोबाईल बँकिंग मुळे बँकांमध्ये मनुष्यबळाची तर बचत झालेलीच आहे परंतु ग्राहकांची सुद्धा वेळेची बचत झालेले आहे. ग्राहक 24 तास केव्हाही कोठेही जगभरात या मोबाईल बँकिंगचा वापर तो करू शकतो म्हणून बँकिंग विकासातील महत्त्वाचे पाऊल म्हणून आपण मोबाईल बँकिंग कडे पाहू शकतो. मोबाइल बँकिंगच्या द्वारे ग्राहक पैसे ट्रान्सफर करणे, कर्जाचे हप्ते ट्रान्सफर करणे, क्रेडिट कार्ड चे पैसे भरणे व इतर सर्व ठिकाणी या मोबाईल बँकिंगचा वापर करू शकतो.

**प्रस्तावना:**

मोबाईल बँकिंग ही संकल्पना टेलि- बँकिंग संकल्पनेपेक्षा थोडी वेगळी आहे. ग्राहकाजवळ जर अँड्रॉइड मोबाइल असेल व इंटरनेटची उपलब्धता असेल तर तो बँकेचे मोबाईल ॲप आपल्या मोबाईल

मध्ये डाऊनलोड करून त्याचा वापर बँकिंग व्यवहारासाठी तू करू शकतो. बँकेने ग्राहकास त्यांच्या विनंतीनुसार उपलब्ध करून दिलेला ग्राहक किंवा खाते क्रमांक आणि पासवर्ड याचा वापर करून ग्राहक मोबाईल बँकिंग सेवेचा लाभ घेऊ शकतो. सध्याच्या काळात जास्तीत जास्त बँका स्मार्टफोनवर सेवा प्रणाली ग्राहकांना उपलब्ध करून देत आहे. मोबाईल बँकिंग द्वारे ग्राहकाला पैसे हस्तांतर करणे, गुंतवणूक करणे, मुदत ठेव ठेवणे, कर्ज घेणे, खाते उतारा मिळवणे अशा अनेक गोष्टी करता येतात. ग्राहक 24 तास केव्हाही कोठेही जगभरात या मोबाईल बँकिंगचा वापर तो करू शकतो म्हणून बँकिंग विकासातील महत्त्वाचे पाऊल म्हणून मोबाईल बँकिंग कडे पाहिले जाते.

**उद्दिष्टे:**

१. मोबाईल बँकिंग चे वैशिष्ट्ये व महत्त्व अभ्यासणे

२. मोबाईल बँकिंग साठी लागणाऱ्या ॲप्सचा अभ्यास करणे

**मोबाईल बँकिंग ची वैशिष्ट्ये:**

**१.सुविधा आणि अनुकूलता:**

मोबाईल बँकिंग सुविधा ही बँक ग्राहकाला 24 X 7 या तत्त्वावर उपलब्ध असते. म्हणजेच मोबाईल बँकींग सुविधांचा वापर ग्राहक जगभरातून कोठूनही कोणत्याही वेळी करू शकतो.ई- बँकिंग च्या तुलनेत मोबाईल बँकिंगचा वापर हा सोपा असतो. ग्राहक आपल्या पसंतीनुसार मोबाईल बँकिंग मधील सेवांचा क्रम व त्याचा वापर करून निश्चित करू शकतो.

**२.खाते व्यवस्थापन:**

मोबाइल बँकिंगच्या माध्यमातून खातेधारक आपल्या बँक खात्याचे व्यवस्थापन करू शकतो. यामध्ये तो बचत खाते, ठेव खाते किंवा कर्ज खाते या सर्वांचा समावेश होतो. मोबाईल बँकिंग चा वापर करून ग्राहक नवीन चेक बुक ची मागणी करू शकतो, आपला खाते उतारा मिळवतो, क्रेडिट कार्ड संदर्भात तपशील मिळवतो, कर्जाचा हप्ता किंवा थकीत रक्कम याची माहिती घेतो. आपल्या खात्यामध्ये शिल्लक रक्कम व खर्च रकमेचा आढावा घेता एकूणच आपल्या बँक खात्याचे व्यवस्थापन तो स्वतः करू शकतो

**३.कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर:**

मोबाईल बँकिंग मध्ये ग्राहकाच्या तक्रारी अथवा शंकाचे निरसन करण्यासाठी व ग्राहकाला मार्गदर्शन करणे व सल्ला देणे या कामासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारित आज्ञा प्रणालीचा अथवा चाटबोट चा वापर केला जात आहे. या माध्यमातून आपल्या ग्राहकाला वेगवान सेवा बँक उपलब्ध करून देत आहे तसेच बँकांचा मानवी संसाधनावर जो खर्च होतो तो खर्च कमी करण्यास मोबाईल बँकिंग हे महत्त्वाचे साधन बनले आहे.

**४.आर्थिक व वित्तीय नियोजन:**

मोबाईल बँकिंग मुळे ग्राहकाला आपल्या खात्यातील शिल्लक रक्कम माहित असल्यामुळे तो आपले आर्थिक व वित्तीय नियोजन चांगल्या प्रकारे करू शकतो. तो आपल्या उत्पन्नाचा स्रोत आणि खर्च याचा ताळेबंद करून नियोजन करू शकतो.

**५.गुंतवणूक व भुगतान माध्यम:**

मोबाईल बँकिंग कडे गुंतवणूक व भुगतान माध्यम म्हणून पाहिले जात आहेमोबाइल बँकिंगच्या माध्यमातून ग्राहक विमा क्षेत्र, संस्थागत ठेवी, म्युचल फंड, भाग बाजार, पेन्शन योजना इत्यादी मध्ये गुंतवणूक करू शकतो त्याचबरोबर तो गुंतवणूक केलेल्या रकमेचा आढावाही घेऊ शकतो मोबाईल बँकिंग चा उपयोग ऑनलाईन खरेदी मध्ये भुगतान करण्यासाठी, बिले भरण्यासाठी तसेच मोबाईल रिचार्ज करण्यासाठी करता येतो. यासोबतच पैसे अथवा निधी हस्तांतरणाचा एक सुलभ मार्ग म्हणून मोबाईल बँकिंगचा वापर केला जात आहे.

**६.सुरक्षितता:**

मोबाईल बँकिंग सुविधा ही प्राथमिकता ग्राहकाच्या मोबाइल क्रमांकाशी निगडित असते मोबाईल ॲपच्या माध्यमातून या सेवेचा वापर करताना ग्राहकाला त्याला देण्यात आलेला ग्राहक ओळख क्रमांक तसेच संकेतांक चा वापर करावा लागतो मोबाईल बँकिंग च्या माध्यमातून होणाऱ्या प्रत्येक व्यवहारासाठी ग्राहकाला आपल्या बँकेमधून आपल्या मोबाईल क्रमांकावर एक ओटीपी येत असतो त्याचा वापर ग्राहक आपल्या व्यवहारासाठी करतो तसेच आपण आपल्या मोबाईल मधून आपल्या बँकेचे ॲप ओपन

केल्यानंतर आपल्या मोबाईल क्रमांकावर लगेच एक मेसेज येतो त्यामुळे आपले मोबाईल बँकिंग ॲप कोणीतरी वापरत असेल तेर लगेच समजते म्हणून मोबाईल बँकिंग हे एक सुरक्षित साधन आहे

**मोबाईल बँकिंग चे महत्व:**

१. बँकिंग सेवांच्या पोहोच व विस्तारास मदत

२. बँकाच्या कार्यकारी खर्चातील बचत

३. वापरण्यास सुलभ व गुणवत्तापूर्ण बँकिंग सेवेची बँक ग्राहकासाठी उपलब्धता

४. ग्राहकाच्या बँकिंग सेवा वापरा विषयक माहितीची उपलब्धता

५. सुरक्षितरित्या बँकिंग व्यवहार पूर्ण करण्याची सोय

६. रोकड विरहित अर्थव्यवस्थेत अर्थव्यवस्थेच्या निर्मितीस चालना

७. कागद विरहित बँकिंगद्वारे पर्यावरण संरक्षणासाठी हातभार

**मोबाईल बँकींग ॲप्स (Mobile Banking Apps)**

भारतात आजच्या घडीला बँकिंग क्षेत्रात अस्तित्वात असणाऱ्या सार्वजनिक, खाजगी तसेच सहकारी क्षेत्रातील सर्व बँकांनी आपल्या ग्राहकासाठी मोबाईल बँकिंग ॲप विकसित केले असून ते आपल्या ग्राहकाला वापरासाठी उपलब्ध करून दिले आहे यातील काही प्रमुख बँका व त्याची ॲप्स पुढीलप्रमाणे

| Sr. No. | Name of Bank | Apps |
|---|---|---|
| 1 | ICICI Bank | iMobile Pay |
| 2 | State Bank of India | SBI YONO |
| 3 | HDFC Bank | HDFC Bank Mobile Banking |
| 4 | Bank of Baroda | M-Connect Plus |
| 5 | Axis Bank | Axis Mobile |
| 6 | Kotak Bank | Kotak- 811 |
| 7 | IDBI Bank | IDBI Go Mobile+ |

| | | |
|---|---|---|
| 8 | Canara Bank | CANDI- Mobile Banking App |
| 9 | Bank of India | BOI Mobile |
| 10 | Punjab National Bank | PNB ONE |
| 11 | Bank of Maharashtra | Maha Mobile |

**निष्कर्ष :**

ई -बँकिंग चे एक वैशिष्ट्ये म्हणून आपण मोबाईल बँकिंग कडे पाहतो मोबाईल बँकिंग मुळे बँकेतील मनुष्यबळाची बचत झालेली आहे. भारतामध्ये आजच्या गतीला जवळ जवळ सर्व ग्राहकाकडे अँड्रॉइड मोबाईल आहेत. अँड्रॉइड मोबाइल व इंटरनेटची उपलब्धता असेल तर ग्राहक आपल्या बँकेचे मोबाईल ॲप आपल्या मोबाईल मध्ये डाऊनलोड करून प्रत्येक सेवेचा उपयोग करून घेऊ शकतो. बँकेने ही सुविधा ग्राहकांना 24 तास उपलब्ध करून दिली आहे. जगभरातून कोठेही, केव्हाही, कधीही हे ॲप वापरू शकतो त्याच बरोबर हे ॲप निशुल्क उपलब्ध करून दिलेले आहे. या ॲपच्या वापरामुळे ग्राहकाला आपले खाते व्यवस्थापन व आर्थिक नियोजन करता येते तसेच मोबाईल बँकिंग मुळे वेळेची बचत होते व ग्राहक रोकड विरहित व्यवहार करू शकतो. आज भारतामध्ये सर्वच बँकांनी सुरक्षित मोबाईल ॲप्स तयार केलेले आहेत त्याचा वापर जर ग्राहकांनी केला तर वेळेची बचत होऊन प्रत्येक व्यवहार तो आपल्या मोबाईल द्वारे करू शकतो . बँकिंग विकासातील महत्त्वाचे साधन म्हणून आपण मोबाईल बँकिंग कडे बघू शकेल.

**संदर्भ:**


1. Prasanna Chandra: Fundamentals of Financial Management
2. S. Natarajan and R. Parameswaran: Indian Banking
3. Trivedi & Shrivastava: Money Banking and Public Finance
4. https://moneyview.in/beginners-guide-managing-money/top-mobile-banking-apps-india#label2